राज्य शासकीय कर्मचारी
गटविमा योजना १९८२ -
वर्गणीच्या दरात वाढ करणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
शासन निर्णय, क्रमांक: गविपे १०८९/प्र.क्र.६६४/८९/विमा,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक : ८ जानेवारी १९९०.

संदर्भ : शासन निर्णय, वित्त विभाग क्र. डीओआय २०८१/४७०१/एडीएम-५, दिनांक २६ एप्रिल, १९८२.

## शासन निर्णय

संदर्भाधिन दिनांक २६ एप्रिल १९८२ च्या शासन निर्णयानुसार राज्य शासकीय कर्मचा-यांचा सेवेत असतांना मृत्यु झाल्यास त्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत मिळावी, आणि राजीनामा, सेवानिवृत्ती इत्यादी कारणामुळे कर्मचा-याची सेवा संपुष्टात आल्यास त्याला किंवा त्याच्या कुटुंबाला काही ठोक रक्कम मिळावी या दुहेरी उद्देशाने गटविमा योजना दिनांक १.५.१९८२ पासून लागू करण्यात आली आहे. सदर योजना कर्मचा-यांना सक्तीची असून केंद्र शासकीय कर्मचा-यांकरिता सुरू केलेल्या गटविमा योजनेच्या धर्तीवर आधारित आहे. त्यामुळे केंद्र शासनाने कर्मचा-यांच्या वर्गवारी नुसार विहित केलेले वर्गणीचे दर राज्य शासकीय कर्मचारी गटविमा योजनेकरिता विहित करण्यात आले होते. केंद्र शासनाने आता त्यांच्या कर्मचा-यांकरिता गटविमा योजनेच्या वर्गणीच्या दरात ५० टक्के वृध्दी केलेली असल्याने ते सुधारित दर राज्य शासकीय कर्मचारी गटविमा योजनेकरिता देखील विहित करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने विचार करुन केंद्र शासनाच्या गटविमा योजनेकरिता कर्मचा-यांच्या वर्गवारीनुसार वृध्दी करण्यात आलेले दर राज्य शासकीय कर्मचा-यांना देखील दिनांक १ जानेवारी १९९० पासून लागू करण्याचा निर्णय घेतला; त्यानुसार सध्या अस्तित्वात असलेल्या दराऐवजी खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे गटविमा योजनेची सुधारित वर्गणी राज्य शासकीय कर्मचा-यांच्या जानेवारी १९९० पासूनच्या वेतनातून वसुल करण्याचे आदेश देण्यात येत आहेत :-

[ कृ.मा.प. ]

| वर्ग | १.१.१९९० रोजी शासकीय सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनातून वसूल करावयाची वर्गणी. [रुपये] | २.१.१९९० ते ३१.१२.१९९० पर्यन्त शासकीय सेवेत दाखल झालेल्या कर्मचाऱ्यांच्या मासिक वेतनातून वसूल करावयाचा केवळ विमा संरक्षणाचा हप्ता. [रुपये] | शासकीय सेवेत असताना कर्मचाऱ्याला मृत्यू आल्यास कुटुंबियांना देय होणारी विम्याची रक्कम. [रुपये] |
|---|---|---|---|
| वर्ग-१ | १२०/- [एकशेवीस] | ४० [चाळीस] | १,२०,०००/- [एक लाख वीस हजार] |
| वर्ग-२ | ६०/- [साठ] | २० [वीस] | ६०,०००/- [साठ हजार] |
| वर्ग-३ | ३०/- [तीस] | १० [दहा] | ३०,०००/- [तीस हजार] |
| वर्ग-४ | १५/- [पंधरा] | ५ [पाच] | १५,०००/- [पंधरा हजार] |

२. गट विमा योजनेच्या वर नमूद केलेल्या वाढीव वर्गणी वसूल करण्याच्या संदर्भात राज्य शासकीय गट विमा योजना १९८२ च्या नियमात आवश्यक त्या दुरुस्त्या यथावकाश स्वतंत्रपणे करण्यांत येतील.

३. सर्व विभाग प्रमुखांनी सदर आदेश त्यांच्या नियंत्रणाखालील कार्यालय प्रमुख व इतर कार्यालये यांच्या निदर्शनास आणावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[व. ना. सावंत ]
शासनाचे उप सचिव, वित्त विभाग.

प्रत रवाना:-

महालेखापाल[लेखा व अनुज्ञेयता]-१, महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता]-२, महाराष्ट्र, नागपूर
महालेखापाल [लेखा परीक्षा]-१, महाराष्ट्र, मुंबई,
महालेखापाल [लेखा परीक्षा]-२, महाराष्ट्र, नागपूर,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
उपसंचालक, लेखा व कोषागारे, पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक,